



# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक २४५, शनिवार १५ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# चोहोबाजूंनी घेरलं म्हणून माझं लोकसभेचं ठरलं!

## ■ खासदार नीलेश लंके यांनी स्पष्ट केली भूमिका ■ बीबीसी मराठीला लंके यांची मुलाखत

पारनेर : प्रतिनिधी

**महायुती सरकार असताना जिल्हयात विखे यांना पालकमंत्रीपद मिळाले. त्यांनी आपल्या मतदारसंघातील निधी थांबविण्यासाठी प्रयत्न केले. माझ्या कार्यकर्त्यांच्या व्यवसायांची माहीती घेऊन त्यांना कुठे अडचणीत आणता येईल का यासाठी प्रयत्न झाले. विखे यांनी मला चोहोबाजूंनी घेरण्याचा प्रयत्न केला. विखे यांच्या प्रत्येक भाषणात आपल्या विषयी बोलले गेले. त्यामुळेच मी लोकसभा निवडणूकीत उतरण्याचा निर्णय घेतल्याच्या भावना खासदार नीलेश लंके यांनी बीबीसी मराठीला दिलेल्या मुलाखतीमध्ये व्यक्त केल्या.**

या लोकसभा निवडणूकीत विखेंचा प्रथमच पराभव झाला. बाळासाहेब विखे यांचा पराभव झाला मात्र त्यांनी त्यावेळी ती निवडणूकच रद्द ठरवली. विखे घराणे राज्यातील मातब्बर घराणे म्हणून ओळखले जाते. विशेषतः सुजय विखे यांच्याविरोधात निवडणूक लढविताना विखे यांना तुमचा इतका विरोध का, असे काय घडले की तुम्ही ठरविले की मी विखेंविरोधात लढणार म्हणून ? या प्रश्नावर उत्तर देताना खा. लंके यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी आपली कोंडी केली म्हणून आपण निवडणूकीच्या रिंगणात उडी घेतल्याचे स्पष्ट केले.

अजित पवारांकडून शरद पवारांकडे येत तुम्ही लोकसभा निवडणूकीत मोठा विजय संपादन केला. या लढतीकडे राज्याचे लक्ष लागले होते. तुमचा निर्णय योग्य ठरला का या प्रश्नावर बोलताना माझा निर्णय योग्यच होता. अजितदादांसोबत राहण्यामागेही कारण होते. दादांनी मला २०१९ च्या निवडणूकीत उमेदवारी दिली. ते अर्थमंत्री झाल्यानंतर त्यांनी निधी देउन त्यांनी मला चांगली ताकद दिली. दादांनी महायुतीच्या सरकारमध्ये पुन्हा शपथ घेतली त्यावेळी आम्ही त्यांच्यासोबत होतो. त्यावेळी आम्ही दोन्ही बाजूंनी विचार केला. राज्याच्या राजकारणात दादांचे राजकारण टिकले पाहिजे. त्यांचे नेतृत्व राज्यासाठी गरजेचे आहे. मी आमदार असलो काय नसलो काय राज्याला फरक पडणार नाही. त्यामुळे मी दादांसोबत जाण्याचा निर्णय घेतल्याचे लंके म्हणाले.



### मतदारसंघाशी माझं जिव्हाळयाचं नातं

शिवसेना, अजितदादा व आता शरद पवार या प्रवासात तुमचा मतदारसंघ आहे तो कसा सोबत ठेवला ? या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले,माझ्या मतदारसंघाशी माझं जिव्हाळयाचं नातं आहे. मी मतदारसंघात विकास कामे केलीच. परंतू प्रत्येकाच्या सुख, दुःखात सहभागी होतो, प्रत्येकाच्या अडीअडचणीत धावून जातो. प्रत्येकाच्या संकटप्रसंगी मी त्यांच्या बाजूने हजर राहण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे माझ्या पारनेर-नगर मतदारसंघात माझी चांगली पकड होती. हा मतदारसंघ माझ्याशी व्यक्तीगत जोडलेला आहे.

### निवडणूक झाली विषय संपला !

निवडणूकीत इंग्रजीचा मुद्दा गाजला. आता तुम्ही इंग्रजीची शिकवणी लावणार का ? या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, ज्यावेळी निवडणूकीचा निकाल लागला. मी माझे प्रमाणपत्र स्विकारले त्यानंतर मी विखे कुटूंबाविषयी एकही शब्द बोललो नाही. राजकारणात काही गोष्टी पाळाव्या लागतात. त्यांनी टीका टिपन्नी केली, मी त्यांच्यावर टिका केली. मात्र निवडणूक झाली विषय संपला. रात गई बात गई. विखे परिवारावर आता बोलणे मला योग्य वाटत नाही. विखे परिवार मोठा आहे. त्यांची राजकीय, सामाजिक पार्श्वभुमी, त्यांचा सहकाराबद्दलचा अभ्यास केला तर ते वेगळया उंचीवरचे लोक आहेत.

### गुंड असतो तर डोक्यावर घेतले असते का ?

नीलेश लंके गुंड, आक्रमक आहेत असा आरोप केला जातो या प्रश्नावर बोलताना माझी गुंडगिरी असती तर लोकांनी मला निवडूनच दिले नसते. माझा राजकीय प्रवास पाहिला तर मी सर्व संसद सदस्यांमध्ये एकमेव असेल की सरपंच, पंचायत समिती, जिल्हा परिषद, आमदार, खासदार असा प्रवास केलेला आहे. माझी पार्श्वभुमी गुंडगिरीची असती तर लोकांनी मला डोक्यावर घेतलेच नसते. माझी निवडणूक जनतेने हाती घेतली होती. लोक पैसे देऊन माझी निवडणूक करतात. माझ्यावर एखादा गुन्हा दाखल आहे का ? मी सामान्य माणूस आहे, राजकारणात हे सुरूच असते असे लंके म्हणाले.

### इतरांना धक्का न लावता आरक्षण हवे

मराठा आरक्षणाबाबत तुमची भूमिका काय यावर बोलताना कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण मिळावे अशी आमची भूमिका आहे. त्यासाठी आम्ही आंदोलनही केले. मात्र दुसऱ्याच्या ताटातून इतरांना आरक्षण देणे योग्य नाही. ओबीसी समाजाचे आरक्षण अबाधित राहिले पाहिजे. त्यांचे आरक्षण टीकून मराठा समाजाला आरक्षण दिले पाहिजे. जरांगे पाटलांचाही हाच मुद्दा असल्याचे लंके म्हणाले.

### राजकारणात काही गोष्टी पाळायच्या असतात

अजित पवार गटातून शरद पवार गटामध्ये प्रवेश केल्यानंतर अजित पवार यांनी नीलेश लंके हे पारनेरपुरते मर्यादीत असून या निवडणूकीत त्यांना यश येणार नसल्याची टीका अजित पवार यांनी केली होती. पवार यांचा हा दावा फोल ठरवून तुम्ही विजयी झाला आहात. अजित पवार यांनी तुमचे अभिनंदन केले का ? या प्रश्नावर सगळया गोष्टी माध्यमांपुढे सांगायच्या असतात का ? राजकारणात काही गोष्टी पाळाव्या लागतात. राजकारणापलीकडेही काही गोष्टी असतात. मला भाजपाच्या लोकांनीही शुभेच्छा दिल्या. मग त्यांचीही नावे सांगायची का असे सांगत लंके यांनी या प्रश्नाला बगल दिली.

### तो अधिकार पवार साहेबांना

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपला चार महिन्यांचा कालावधी राहीला असल्याचे सांगितले आहे. तुम्हाला प्रदेशाध्यक्ष कोण हवा ? की पाटील हेच पुन्हा हवेत या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, मी पक्षाचा छोटा घटक आहे, छोटा कार्यकर्ता आहे. प्रदेशाध्यक्षपदाच्या निवडीबाबत मी बोलू शकत नाही. आपल्याला मर्यादा असतात. प्रत्येक माणसाने मार्यादा पाळल्या पाहिजेत. तो अधिकार पवार साहेबांना आहे. तो अधिकार मला दिलेला नाही, त्यावर बोलणे योग्य नाही.

### शरद पवारांचा परिवार

रोहित पवार, जयंत पाटील यांच्यात शितयुध्द सुरू आहे. नगरच्या मेळाव्याच जयंत पाटील यांनी त्यांची खंत बोलून दाखविली. यावर बोलताना राष्ट्रवादीबाबत चुकीची माहीती पसरविली जाते. राष्ट्रवादी काँग्रेस हा अगोदर पवार साहेबांचा परिवार आहे. या परिवारात एकमेकांबद्दल मतभेद नाहीत. काही विषय चुकीच्या पध्दतीने पुढे आणले जातात. तसे पक्षात कुठलेही मतभेद नसल्याचे लंके म्हणाले.

### आजून माझी हळदही फिटली नाही !

आगामी विधानसभा निवडणूकीसाठी सर्वच पक्षांची तयारी सुरू केली आहे. तुमच्यावर काही जबाबदारी सोपविली आहे का या प्रश्नावर लंके यांनी मिश्किल उत्तर दिले. आताच मी दिल्लीवरून काही कागदपत्रांची पुर्तता करून आलोय. आजून माझी हळदही फिटली नाही. चार आठ दिवस जरा आम्हाला या विश्वात राहू द्या ना !

### त्याशिवाय मी खासदार झालो काय ?

प्रदेशाध्यक्ष म्हणून जयंत पाटील असताना तुम्हाला सहकार्य मिळाले का या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, सहकार्य झाल्याशिवाय माझ्यासारखा सामान्य माणूस खासदार झाला का ? सर्व पक्ष, पार्टी माझ्या मागे हिमालयासारखे उभे राहिले. राष्ट्रवादीच नव्हे, काँग्रेसच, शिवसेना, आम आदमी, कम्युनिष्ट पार्टी, आंबेकरी चळवळीतील कार्यकर्ते, विविध संघटना माझ्या पाठीशी उभ्या होत्या असे लंके म्हणाले.

# राहुल झावरेंसह २४ लंके समर्थकांना अंतरीम जामीन

## ॲट्रसिटीसह विनयभंगाचा दाखल झाला होता गुन्हा

नगर : प्रतिनिधी

**नीलेश लंके यांचे सहकारी ॲड. राहुल झावरे यांच्यासह लंके यांच्या २४ सहकाऱ्यांवर दाखल करण्यात आलेल्या ॲट्रॅसिटीसह विनयभंगाच्या गुन्हयाप्रकरणी नगरच्या सत्र न्यायालयाने सर्व आरोपींना शुक्रवारी अंतरिम जामीन मंजुर केला.**

राहुल झावरे, प्रसाद नवले, अनिल गंधाक्ते, संदीप ठाणगे, राजू तराळ, महेंद्र गायकवाड, संदीप चौधरी, नंदू दळवी, किरण ठुबे, रामा तराळ, जितेश सरडे, कारभारी पोटघन, दादा शिंदे, बापू शिर्के, बाजीराव करखीले, किशोर ठुबे, दीपक लंके, दत्ता ठाणगे,लखन ठाणगे, अक्षय चेडे, बंटी दाते, श्री गंधाक्ते, संदेश बबन झावरे यांच्यावर दि. ७ जुलै रोजी नगरच्या तोफखाना पोलीस ठाण्यात पारनेर तालुक्यातील गोरेगांव येथे दि. ६ जुलै रोजी घडलेल्या घटनेप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपींच्या वतीने नगरच्या सत्र न्यायालयात जामीनासाठी अर्ज दाखल करण्यात आले होते.

आरोपींच्या वतीने ॲड. सतिश गुगळे, ॲड. अभिषेक भगत, ॲड. अरूण बनकर, ॲड. गणेश कावरे, ॲड. स्नेहा झावरे यांनी काम पाहिले. घटना दि. ६ जुलै रोजी घडलेली असताना गुन्हा मात्र दि. ७ जुलै रोजी पारनेर



ऐवजी नगर येथे उशिरा दाखल करण्यात आला. फिर्यादीत नमुद तारखेस घटना घडली त्याच दिवशी या फिर्यादीमधील आरोपी ॲड. राहुल झावरे यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. त्यासंदर्भात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल झाल्याने त्यास विरोध करण्यासाठी हा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे तसेच या गुन्हयास राजकीय रंग असल्याचे आरोपींच्या वतीने न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

यावेळी न्यायालयापुढे विविध आरोपी घटना घडली त्यावेळी कोणत्या ठिकाणी होते त्याचे सीसीटीव्ही फुटेज, या फिर्यादीमधील आरोपी राहुल झावरे यांना झालेल्या मारहाणीचे व्हिडीओ तसेच ते आजूनही अतिदक्षता विभागात उपचार घेत असल्याबाबतच्या बाबी वकीलांनी न्यायालयापुढे कथन केल्यानंतर न्यायालयाने सर्व आरोपींना अंतरीम जामीन मंजुर केला.

# अजित पवारांच्या अडचणी वाढल्या

- ■ शिखर बँक घोटाळा प्रकरण
- ■ क्लिनचीटवर अण्णा हजारेंचा आक्षेप
- ■ क्लोजर रिपोर्टला आव्हान देणार

मुंबई : प्रतिनिधी

**शिखर बँक घोटाळा प्रकरणातल्या अतिरिक्त क्लोजर रिपोर्टला ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे आव्हान देणार आहेत. अजित पवार यांना दिलेल्या क्लीन चिटला अण्णा हजारे विरोध करणार असून त्यासंदर्भात त्यांनी कोर्टात धाव घेतली आहे.**



अण्णा हजारे आणि माणिकराव जाधव यांच्या वकिलांनी पोलिसांच्या अतिरिक्त क्लोजर रिपोर्टवर आक्षेप घेतला आहे. न्यायालयाने हा आक्षेप मान्य करत निषेध याचिका दाखल करण्यास अण्णा हजारे आणि उर्वरीत पान ३ वर

# अपघाताने भेट झाली तरी ती चुकच!

## गजा मारणेच्या भेटीसंबंधात खा. नीलेश लंके यांचा खुलासा

पारनेर : प्रतिनिधी

**गुरूवारी पुण्याच्या दौऱ्यात असताना कुख्यात गुंड गज्या मारणे याची झालेली भेट ही अपघाताने झाली होती. सांत्वनपर भेट घेऊन परतत असताना ती व्यक्ती भेटली, ती व्यक्ती कोण ? तीची पार्श्वभुमी काय याबाबत मला काहीही माहीती नव्हते. ती व्यक्ती गुंड आहे हे मला शुक्रवारी सकाळी वृत्तवाहिन्यांच्या बातम्यांमधून समजले. अर्थात अपघाताने भेट झाली तरी ती चुकच होती अशी कबुली खा. नीलेश लंके यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना दिली.**

गुरूवारी खा. नीलेश लंके यांनी कुख्यात गुंड गजा मारणे याच्या घरी



जाऊन सत्कार स्विकारल्यानंतर विविध माध्यमांमधून त्याच्या बातम्या झळकल्या. सत्ताधारी पक्षाकडूनही लंके यांच्यावर टीका करण्यात येत असल्याच्या पार्श्वभुमीवर माध्यम प्रतिनिधींशी बोलताना लंके यांनी हा खुलासा केला आहे.

पत्रकारांशी बोलताना लंके म्हणाले, दिल्लीमध्ये उर्वरीत पान ३ वर

### रोहित पवारांचाही माफीनामा

नीलेश भाऊंनी याबाबत माफी मागितली आहे. त्यांना काही माहीती नव्हते. कार्यकर्त्यांना विनंती आहे. कुठल्याही नेत्याला एखाद्याच्या घरी नेत असताना वेगळा संदेश जाईल असे कृत्य करू नये. कारण त्यांना लोक फॉलो करीत असतात. जशी नीलेश भाऊंनी माफी मागितली तशी मी देखील माफी मागतो. आमच्यातला एक खासदार न कळत चुकीची प्रवृत्ती असलेल्या व्यक्तीच्या घरी गेला. कृपया यावर कोणी राजकारण करू नये ही विनंती.

आ. रोहित पवार

# प्रा. भाऊसाहेब कचरे यांनी विश्वासार्हता गमावली!

## नगर जिल्ह्यातील शिक्षकांची भावना

नगर : प्रतिनिधी

**शिक्षक मतदारसंघातील टीडीएफचे उमेदवार प्रा. भाउसाहेब कचरे हे शिक्षक नसून राजकारणी आहेत. त्यांनी आतापर्यंत विविध पक्षांकडून निवडणूका लढविल्या. टीडीएफच्या उमेदवाराच्या पराभवासाठी खतपाणी खालणारे कचरे हे आता स्वतः टीडीएफचे उमेदवारी करीत असून त्यांची आजवरची वाटचाल पाहता त्यांनी त्यांची विश्वासार्हता गमावली असल्याच्या भावना नगर जिल्हयातील शिक्षकांकडून व्यक्त करण्यात येत आहेत.**

नाशिक शिक्षक मतदारसंघामध्ये एकूण २१ उमेदवार रिंगणात असून अपक्ष विवेक कोल्हे यांच्या उमेदवारीमुळे



या निवडणूकीत रंगत निर्माण झाली आहे. शिवसेना शिंदे गटाचे किशोर दराडे, शिवसेना ठाकरे गटाचे ॲड. संदीप गुळवे, राष्ट्रवादीचे मधुकर भावसार हे इतर प्रमुख उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

या निवडणूकीत टीडीएफ संघटनेच्या पाठींब्यावर प्रा. भाऊसाहेब कचरे हे निवडणूकीच्या रिंगणात असून त्यांच्या आजवरच्या भूमिकेमुळे शिक्षकांमध्ये त्यांच्याविषयी नाराजी आहे. प्रा. कचरे यांनी यापूर्वी शिक्षक मतदार संघातून दोनदा निवडणूका लढविल्या. त्यावेळी त्यांनी पक्षाचा आधार घेतला. पक्षाचा आधार घेऊनही त्यांना दोन्ही निवडणूकीत अपयश आले. या निवडणूक लढविताना त्यांनी टीडीएफने समर्थन केलेल्या उमेदवाराचे खच्चीकरण कसे होईल याचीच काळजी वाहिली. प्रा. कचरे हे शिक्षक नसून राजकारणी आहेत.

राजकीय पक्षांनी उमेदवारी नाकारल्यावर ते टीडीएफकडे उमेदवारीसाठी आले. वेळोवेळी टीडीएफला पाण्यात पाहणाऱ्या प्रा. कचरे यांना मतदार कसे स्विकारतील ? मतदार त्यांना मतपेटीतून आपली ताकद दाखवून देतील असा विश्वास शिक्षक मतदारांमधून व्यक्त करण्यात येत आहे.







# युवा


## हनिमूनला झालेल्या या ५ चुका वैवाहिक जीवन करतात उद्ध्वस्त

**हनीमून हा जोडप्यांसाठी सर्वात सुंदर क्षण आहे. यादरम्यान ते एकमेकांना समजून घेतात आणि भावनिकरित्या कनेक्ट होऊ शकतात. पण हनिमूनला झालेल्या त्यांच्या काही चुकांमुळे त्यांचे वैवाहिक जीवन गोड सुरुवात करण्याऐवजी उद्ध्वस्त होऊ शकते. अशा परिस्थितीत, हे करणे पूर्णपणे टाळणे चांगले.**



लग्नानंतरचा हनिमून हा जोडप्यांसाठी सर्वात खास क्षण असतो. या काळात, कुटुंब आणि नातेवाईकांपासून दूर, जोडप्यांना एकमेकांना जाणून घेण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी वेळ मिळतो. प्रेमविवाह असेल तर गोष्ट वेगळी, पण लग्न जर अरेंज्ड मॅरेज असेल तर पती-पत्नीला एकत्र वेळ घालवण्याची ही पहिलीच संधी असते. अशा परिस्थितीत या वेळेचा खर्च आणखी वाढतो. हनिमूनचा संबंध सहसा फक्त शारीरिक संबंधांशी असतो, पण सत्य हे आहे की विवाहित जीवनात प्रथमच प्रवेश करणारी जोडी पती-पत्नी म्हणून एकमेकांसोबत वेळ घालवत असते. या क्षणांशी खूप खोल भावना निगडीत आहेत. यामुळेच या काळात काही चुका झाल्या तर आपल्या वैवाहिक जीवनाची चांगली सुरुवात करण्याचा विचार करणाऱ्या जोडप्याचे वैवाहिक जीवन आपोआपच विनाशाकडे घेऊन जाते. अशाच काही चुका येथे सांगितल्या जात आहेत, ज्या हनीमूनला जाणाऱ्या जोडप्यांनी टाळल्या पाहिजेत.

- लग्नादरम्यान जे काही घडले त्यावर चर्चा करणे टाळा : लग्न समारंभात काहीतरी चूक होते हे सर्वांनाच माहीत आहे आणि समजते. याबाबत दोन्ही पक्षांमध्ये वाद किंवा मतभेद असू शकतात, परंतु हनिमूनच्या वेळी या गोष्टींवर चर्चा करत राहणे ही सर्वात मोठी चूक आहे.
- खूप अपेक्षा : पूर्वनियोजित पुलाव शिजवू नका. हनिमूनचा प्रवास ही एकमेव गोष्ट आहे जी तुम्ही आगाऊ योजना करू शकता. पण यानंतर तुमचा वेळ किती आनंदात जाईल हे फक्त जोडप्याच्या दुतर्फा प्रयत्नांवर अवलंबून असेल. जबरदस्तीच्या अपेक्षा घेऊन जाऊ नका आणि त्या पूर्ण झाल्यावर गर्वाने बसू नका. त्यापेक्षा, हनिमूनमध्ये तुम्ही दोघे भावनिकदृष्ट्या कसे जवळ येऊ शकता आणि एकमेकांना पती-पत्नी म्हणून स्वीकारून वैवाहिक जीवनात पुढे कसे जाऊ शकता यावर लक्ष केंद्रित करा.
- भूतकाळाबद्दल बोलणे टाळा : समजा तुम्ही मनाने खूप प्रामाणिक आणि स्वच्छ व्यक्ती आहात आणि तुम्हाला तुमच्या जोडीदारापासून कोणतीही गोष्ट लपवून ठेवायची नाही, पण हनिमूनला भूतकाळाबद्दल अजिबात बोलू नका. तुमचा भूतकाळ तुमच्या मागे आहे आणि आता तुम्ही नवीन आयुष्य सुरू करत आहात. अशा स्थितीत मनातून काढून टाका की आधी काय होतं. तुमच्या नवीन जोडीदाराचे आणि आयुष्याचे कौतुक करून दर्जेदार वेळ घालवा. आनंदी क्षणांच्या जास्तीत जास्त आठवणी गोळा करा. जेणेकरून भविष्यात हे क्षण तुमच्यासाठी गोड आठवणी बनतील आणि तुमच्या चेहऱ्यावर हास्य आणू शकतील.
- वाद वाढवणे टाळा : कोणतीही दोन व्यक्ती सारखी नसतात यात शंका नाही. अशा परिस्थितीत, हनीमूनमध्ये असे अनेक क्षण येऊ शकतात, जेव्हा दोघांच्या वेगळ्या विचारसरणीत संघर्ष होऊ शकतो. पण त्यांना अजिबात वरचढ होऊ देऊ नका किंवा त्यांना मोठे होऊ देऊ नका. एखाद्या गोष्टीवरून वाद झाला तर दोन मिनिटे ब्रेक घ्या, एकमेकांना सॉरी म्हणा आणि मग पुन्हा आनंदी व्हा आणि एकत्र वेळ घालवा. छोट्या-छोट्या वादांवर रागवत बसलो तर संपूर्ण हनिमूनच नव्हे तर वैवाहिक जीवनाची संपूर्ण सुरुवातच व्यर्थ वाटू लागते.



### तुमचा संपूर्ण हनीमून हॉटेलच्या खोलीत घालवू नका...

लग्नाचे कार्यक्रम इतके थकवणारे असतात की एखाद्याला अनेक दिवस विश्रांतीची आवश्यकता असते. पण यासाठी हनिमून बनवला जात नाही. तुमच्या खोलीत वेळ घालवण्याऐवजी बाहेर जा आणि निसर्गरम्य ठिकाणे पहा.

## नाही म्हणायला शिका!

**अनेकांना कोणतेही काम नाकारण्यात अडचण येते. पण या समाजात नाही म्हणण्याचे कौशल्य तुमच्यात असले पाहिजे. नाहीतर तुमची फसवणूक होऊ शकते. खरं तर, आयुष्यात असे काही प्रसंग येतात जेव्हा तुम्ही नाही म्हणायला कचरत असाल तर ती तुमची सर्वात मोठी चूक ठरते. अशा प्रसंगी सावधपणे बोलायला शिकणे महत्त्वाचे आहे.**



मला नाही म्हणायला जमत नाही. मला कोणाला नाही म्हणायला त्रास होतो. ही परिस्थिती प्रत्येकासोबत असते. नाही म्हटल्याने आपण गुन्हा केला आहे, असे वाटते. असे बरेच लोक आहेत ज्यांना वैयक्तिक किंवा व्यावसायिक जीवनात कोणाला नाही म्हणण्याची हिंमत नसते. या सवयीमुळे माणसे कधी कधी स्वतःचेच नुकसान करतात. त्यांच्यात तणावही वाढतो. म्हणून, आपल्या आनंदासाठी आणि मजबूत नातेसंबंधासाठी, आपण काही प्रसंगी नकार दिला पाहिजे. असं म्हणतात की खूप चांगलं असणं हे स्वतःच्या नुकसानीचं कारण बनतं. नाही न बोलण्याची तुमची सवयही यापैकीच एक आहे. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी नाही कधी म्हणायचे हे समजून घेतले पाहिजे. कारण काही प्रसंगी हो म्हणणे ही सर्वात मोठी चूक ठरते. अशा परिस्थितीत नाही म्हणायला शिका. चला तर मग आम्ही तुम्हाला कधी, कुठे आणि कसे नाही म्हणायचे ते सांगतो...

### नाही म्हणणे ही एक कला आहे...

वैयक्तिक-व्यावसायिक वाढीसाठी आणि निरोगी नातेसंबंधांसाठी नाही म्हणण्याची कला प्रत्येकाला अवगत असावी. ही कला विकसित झाली की माणसाला त्याच्या आयुष्यात सकारात्मक बदल जाणवतात. जगाला सुखावण्याचे दडपण त्याच्या मनातून दूर होते. मग तो त्याच्या इच्छेनुसार, स्वभावानुसार आणि गरजेनुसार निर्णय घेतो. नाही म्हणायला अजिबात अजिबात संकोच करू नका, जेव्हा संबंध येतो तेव्हा प्रेमाने नकार समजावून सांगा.

- **जेव्हा स्वाभिमानाशी तडजोड करावी लागेल** : कोणतेही काम करताना तुम्ही तुमच्या स्वाभिमानाशी तडजोड करत असाल तर तुम्ही हे काम पूर्णपणे नाकारले पाहिजे. कारण एखाद्या व्यक्तीचा स्वाभिमान त्याच्यासाठी सर्वकाही आहे. त्यामुळे स्वाभिमान लक्षात घेऊन बोलायचेच असेल तर न डगमगता बोलावे.
- **असे काम ज्यामुळे तुम्हाला ताण येतो** : लक्षात ठेवा की मानवाच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक क्षमता मर्यादित आहेत. सगळ्यांना खूश करण्याच्या प्रयत्नात तुम्ही या मर्यादा ओलांडल्यास आणि होय म्हणाल तर त्याचा परिणाम तणाव, जळजळ आणि आरोग्याच्या समस्या असतील. त्यामुळे, ज्या कामात तुम्हाला तणाव वाटत असेल ते काम नाकारणे शहाणपणाचे ठरेल.
- **भीती किंवा धमकी** : आपल्या आजूबाजूला अशी अनेक माणसे सापडतील की, जे आपला अधिकार व्यक्त करताना म्हणतात, मला नाही ऐकायची सवय नाही. अशा लोकांच्या इच्छा पूर्ण करताना काही लोक नाही म्हणण्याची कलाही विसरतात. त्यांनाही नाही म्हणायलाही शिका. तुमच्या होकाराच्या नादात अशी लोक तुमच्यावर हुकूमत गाजवण्यासही कमी करत नाही.
- **जेव्हा विश्वास डगमगतो** : अनेक वेळा असे घडते की आपल्या प्रियजनांच्या बोलण्याने आपल्यावर प्रभाव पडतो आणि आपण त्या कामांना हो म्हणतो ज्यावर आपला स्वतःचा विश्वास नाही. परंतु यामुळे, ते सुख आणि नातेसंबंध आपण वाचवू शकत नाहीत, उलट विनाशाकडे आपल्याला घेऊन जात असते. त्यामुळे जोपर्यंत तुमचा स्वतःवर विश्वास नाही तोपर्यंत हो म्हणण्याची चूक करू नका.



- **जेव्हा नाते विषारी बनते** : वैयक्तिक जीवन असो किंवा व्यावसायिक, जेव्हा नातेसंबंध विषारी होऊ लागतात तेव्हा नाही म्हणणे महत्त्वाचे असते. नात्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी त्यांच्यापासून अंतर राखणे केव्हाही चांगले. समोरच्याने सांगितलेली प्रत्येक गोष्ट मनापासून पाळायची असेल तर नाही म्हणायला हवे. यामुळे तुम्ही काही काळ दुःखी व्हाल, पण रोजच्या तणावातून तुमची सुटका होईल.
- **जर तुमच्याकडे वेळ नसेल तर तुमचे नुकसान होईल** : मागची वेळ कधीच परत येत नाही, म्हणून वेळेचा आदर केला पाहिजे. तुमच्याकडे वेळ नसेल तर दुसऱ्याच्या कामाला नाही म्हणण्यात काही गैर नाही. अशा परिस्थितीत तुम्ही नाही म्हटले नाही तर तुमचे काम वेळेवर पूर्ण करता येत नाही. मग तुमचे थेट नुकसान होते आणि आयुष्यात इतरांपेक्षा मागे राहण्याची शक्यता वाढते. म्हणून, यशस्वी होण्यासाठी नाही म्हणा.

## वयापेक्षा मोठ्या मुलींच्या प्रेमात का पडताहेत मुले?



**बदलत्या काळानुसार डेटिंगच्या जगात अनेक बदल झाले आहेत. मुले आता त्यांच्या वयाच्या मुलींऐवजी त्यांच्यापेक्षा मोठ्या मुलींना प्राधान्य देत आहेत. अशा वेळी विचार नक्कीच येतो की यामागे काय कारण आहे, तर रिलेशनशिप कोचने मुलांच्या आकर्षणाचे कारण सांगितले आहे. प्रेमाचे कोणतेही निश्चित निकष नसतात, म्हणजे कोणाच्याही प्रेमात पडू शकते. जात, रूप आणि वय हे प्रेमाच्या आड येत नाही. तथापि, हे देखील खरे आहे की आजपर्यंत लग्नासाठी मुलीचे वय मुलापेक्षा नेहमीच कमी असणे आवश्यक आहे. समाजानुसार नात्यातील मुलगा मुलीपेक्षा मोठा असावा. पण काळानुसार मुलांच्या आवडीनिवडी बदलत आहेत. आता मुलांची आवड तरुणांमध्ये नाही तर मोठ्या मुलींमध्ये वाढत आहे. ज्याची उदाहरणे चित्रपट आणि टीव्ही इंडस्ट्रीतही पाहायला मिळतात. अशा परिस्थितीत, अशी कोणती कारणे आहेत जी मुले मोठ्या मुलींकडे आकर्षित होतात याचा विचार करणे योग्य आहे. या आकर्षणामागील कारण समजून घेण्यासाठी, आम्ही रिलेशनशिप कोच आणि Predictions for Success चे संस्थापक विशाल भारद्वाज यांच्याशी बोललो. ही कारणे जाणून घेऊया...**

- परिपक्वता आणि आत्मविश्वास : मुले आता त्यांच्या जोडीदारांमध्ये परिपक्वता आणि आत्मविश्वास यासारखे गुण शोधू लागली आहेत. या गोष्टी त्यांच्यापेक्षा मोठ्या मुलींमध्ये जास्त दिसतात. त्या नोकरी किंवा व्यवसाय करत असल्यामुळे त्यांची विचार करण्याची पद्धतही वेगळी असते. जोडीदाराला पर्सनल स्पेस देण्याबरोबरच त्या सपोर्टही करते. ज्यामुळे तरुण मुलांचे आकर्षण निर्माण होते.
- असुरक्षित नाही : जेव्हा जेव्हा लहान मुलाला मोठी मुलगी आवडते तेव्हा त्याला नात्यात असुरक्षितता नसते. कारण वृद्ध महिलांना प्रेम आणि रोमान्सचा अधिक अनुभव असतो. एकटे राहण्याची भीती त्यांच्या मनातून निघालेली असते. नात्यातील स्वाभिमान न गमावता आपल्या जोडीदाराला कसे आनंदी ठेवायचे हे त्यांना माहीत असते.
- संबंध कसे हाताळायचे हे माहित आहे : मोठ्या मुलींचे नातेसंबंधांबाबत स्पष्ट मत असते. तिच्या मनाचा आणि मनाचा योग्य वापर करून नातेसंबंध कसे हाताळायचे हे तिला चांगलेच ठाऊक असते. स्वतःचा आनंद बाजूला ठेवून ती जोडीदाराच्या आनंदाला महत्त्व देते. कारण ती छोट्या छोट्या गोष्टींकडे दुर्लक्ष करायला शिकलेली असते. तिची ही शैली मुलांना आवडते.
- एक चांगला अनुभव घ्या : तरुण मुलींना सांसारिक बाबींची फारशी माहिती नसते. त्यांच्यासाठी छोट्या गोष्टीही मोठ्या होतात. मोठ्या मुलींची समज चांगली विकसित झालेली असते. अशा परिस्थितीत त्यांना कोणत्याही समस्येवर उपाय शोधणे सोपे जाते. त्यामुळे मुलांना तिला आपला जीवनसाथी बनवायचा असते. त्यांना तिच्यासोबत अधिक सुरक्षित वाटते.
- ब्रॉड माइंडेड असणं हेही एक कारण आहे : विवाह किंवा नातेसंबंधातील वयाच्या घटकाबाबत बदलत जाणारे विचार हे देखील याचे प्रमुख कारण आहे. प्रियांका-निक जोनास, ऐश्वर्या-अभिषेक बच्चन आणि बिपाशा-करण सिंग यांसारख्या अनेक सेलिब्रिटींच्या आयुष्याचा परिणाम सामान्य जनजीवनावर झाला आहे. नातेसंबंधात प्रेम आणि आदर महत्त्वाचा असतो आणि त्याचा वयाशी काहीही संबंध नसतो हे आता लोकांना समजू लागले आहे.

## तोच खरा पुरुष!

**जर तो खरा माणूस असेल तर... हे वाक्य चित्रपटातच नाही तर सर्वसामान्यांच्या जीवनातही अनेकांच्या तोंडून बाहेर पडलं असेल. हे शब्द माणसाला सर्वात जास्त चालना देतात. कारण लहानपणापासूनच प्रत्येकाच्या मनात एक चांगुलपणाची भावना तयार केलेली असते. यामुळे व्यक्तीमत्त्व ठरत असते. संस्कार याला कारणीभूत ठरत असतात. प्रामाणिकपणा, माणुसकी जपणाऱ्यांच्या बाजूने चांगली परिस्थिती कायम असते, तर स्वार्थी, कपटी लोकांच्या बाजूने तात्कालिक परिस्थिती जाणवत असली तरी दीर्घकाळ ती टिकत नाही. एक ना एक दिवस त्यांच्या पापाचा घडा भरतोच...**



- दुर्बलांना दाबण्याचा प्रयत्न : खरा माणूस आपली ताकद सिद्ध करण्यासाठी त्याच्यापेक्षा दुर्बलांना दडपण्याचा किंवा शोषण करण्याचा कधीही प्रयत्न करत नाही. उलट तो त्यांना मदत करतो. तो त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बोलतो आणि त्यांचे जीवन सुधारण्याचा प्रयत्न करतो. त्याला भीती वाटत नाही की एक कमकुवत व्यक्ती त्याच्या स्तरावर पोहोचेल. त्याच्यासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जर त्याने दुर्बलांना मदत केली नाही तर तो स्वतःला काय उत्तर देईल?
- मुले, महिला आणि दुर्बलांवर हात उचलणे : वैवाहिक जीवनात, नातेसंबंधात किंवा सामान्य सामाजिक जीवनात काही पुरुष आपल्या शारीरिक शक्तीचा गैरवापर करतात असे अनेकदा दिसून येते. ते लहान मुले, स्त्रिया, वृद्ध आणि कोणत्याही शारीरिक दुर्बल व्यक्तीवर हात उचलतात. यातून त्यांच्या मनात भीती निर्माण होते. त्यांना इतरांना घाबरवायला आवडते. कारण यामुळे त्यांचा अहंकार वाढण्यास मदत होते. सत्य हे आहे की खऱ्या पुरुषाला त्याचे पुरुषत्व सिद्ध करण्यासाठी कोणालाही घाबरवण्याची गरज नाही. त्यापेक्षा इतरांच्या मनात स्वतःबद्दल आदर असणे त्यांच्यासाठी अधिक महत्त्वाचे आहे.
- भावना व्यक्त करत नाही : मुले रडत नाहीत, हे लहानपणापासूनच मुलांच्या मनात इतकं रुजलं आहे की ते मोठे झाल्यावरही कधीच त्यांच्या भावना व्यक्त करत नाहीत. पण खरा पुरुष भावनांपासून दूर पळत नाही. याला तो कमकुवतपणा मानत नाही. उलट ते अभिमानाने आपल्या भावना व्यक्त करतात.
- इतर काय विचार करतील : खरे पुरुष योग्य गोष्ट करण्याआधी लोक काय म्हणतील याचा विचार करत नाहीत! त्यांच्यासाठी, सर्व बाबी म्हणजे जे योग्य आहे त्याचे समर्थन करणे आणि जे चुकीचे आहे ते सहन न करणे. ते त्यांचे काम इतरांकडून प्रमाणित होण्याची वाट पाहत नाहीत.

## रडण्यावर ठेवा नियंत्रण, कुणी म्हणणार नाहीत कमकुवत!

**काहींना राग आला की वाद घालताना अश्रू ढाळतात. आता ज्याच्यावर राग येतो त्याच्यासमोर रडायला लागलं तर तो कमकुवत समजायला लागतो. अशा परिस्थितीत भावनांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. स्वतःला सर्वांसमोर रडण्यापासून रोखण्यासाठी तुम्ही काही टिप्स वापरून पाहू शकता...**

कोणत्याही व्यक्तीचे रडणे ही त्याची कमजोरी समजली जाते पण जर कोणी रडत असेल तर तो अशक्त आहे असे अजिबात समजायचे कारण नाही. अनेकदा तुम्ही पाहिलं असेल की काही लोक रागावतात तेव्हा त्यांना रडावंसं वाटतं. त्यांचा राग तीव्र शब्दांत व्यक्त करायचा असतो, पण राग येण्यापूर्वी अश्रू येतात. वैयक्तिक किंवा व्यावसायिक जीवनात असे प्रसंग अनेकदा येतात. ज्याच्यावर तुमचा राग आहे त्या व्यक्तीसमोर तुम्ही जर रडलात तर अनेकदा तुम्हाला अस्वस्थ वाटते. आपण स्वतःलाच शिव्या देतो आणि त्या वेळी आपण स्वतःला रडण्यापासून का थांबवू शकलो नाही याचे आश्चर्य वाटते. तथापि, काही सोप्या टिप्सचा अवलंब करून, आपण वादाच्या वेळी आपले अश्रू नियंत्रित करू शकता...



- कारण समजून घ्या : तुमच्या वैयक्तिक आयुष्यात व्यावसायिक मीटिंगमध्ये किंवा वादाच्या वेळी तुम्ही कधी रडत असाल, तर प्रथम कारण समजून घेण्यावर लक्ष केंद्रित करा. हे काय आणि का होत आहे याचा विचार करा. जेव्हा तुम्हाला कारण नीट समजले, तेव्हा तुम्ही रडण्याऐवजी प्रतिसाद देऊ शकाल. तर्काने बोलाल तर रडावेसे वाटणार नाही.
- लक्ष विचलित करा : जर तुम्हाला वादाच्या वेळी रडल्यासारखे वाटत असेल तर तुमचे लक्ष दुसरीकडे केंद्रित करण्याचा प्रयत्न करा. चेहऱ्याचे स्नायू घट्ट ठेऊन, हनुवटी थोडी वर उचला. त्यानंतर दीर्घ आणि दीर्घ श्वास घेत राहा. अशा परिस्थितीत इच्छा नसतानाही रडण्याची शक्यता कमी होते. या काळात तुम्ही क्लच, रिंग किंवा शर्टची बटणे इत्यादींसह खेळू शकता.
- थोडा वेळ शांत व्हा : जेव्हा जेव्हा वाद होतो तेव्हा बोलण्यापेक्षा ऐकण्यावर जास्त भर द्या. जेव्हा वाद वाढतो तेव्हा मोठ्याने बोलण्याचा किंवा ओरडण्याचा प्रयत्न करू नका. जर तुम्ही शांतपणे उत्तर दिले आणि परिस्थिती समजून घेतली तर तुम्हाला रडावेसे वाटणार नाही. त्यापेक्षा तुमचा मुद्दा मांडून तुम्ही स्वतःला बरोबर सिद्ध करू शकाल.
- शक्य असल्यास पाणी प्या : वादाच्या वेळी शांत राहण्यासाठी, शक्य असल्यास पाणी प्या, यामुळे तुम्हाला वाद समजण्यास वेळ मिळेल. तसेच पाणी प्यायल्याने तुमचे मन थोडे शांत होईल. यामुळे तुमची भावना थोडी बदलेल, मग तुम्हाला रडावेसे वाटणार नाही. आणि तुम्हाला तुमचे मत मांडण्याची संधी मिळेल.

## शॉर्ट न्यूज

### शेवगाव बसस्थानकात चिखलाचे साम्राज्य

**शेवगाव :** बसस्थानकात झालेल्या चिखलाच्या साम्राज्यावर तत्काळ उपाययोजना करावी अन्यथा दोन दिवसांत गेट बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेनेचे (शिंदे गट) तालुकाप्रमुख आशुतोष डहाळे व अन्य पदाधिकाऱ्यांनी शेवगाव आगाराच्या व्यवस्थापक यांना निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनावर युवा सेनेचे जिल्हाप्रमुख साईनाथ आधाट, विशाल परदेशी, संदीप लांडगे, प्रभाकर गायकवाड, अनिकेत डाके, संदीप देहाडराय, दत्ता कुसळकर यांच्या सह्या आहेत.

### श्रीगोंद्यात भीमा नदीत अवैध वाळू उपसा

**श्रीगोंदा :** राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांनी बांधकामासाठी लागणारी वाळूतस्करी राज्यभर बंद केली असून, श्रीगोंदा तालुक्यात मात्र घोड आणि भिमा नदी पात्रातून जेसीबी पोकलेनच्या साह्याने रात्रंदिवस अनधिकृतपणे वाळू उपसा करून दररोज हजारो ब्रास वाळू चोरीला जात आहे. यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. याकडे महसूल प्रशासन मात्र जाणून बुजून दुर्लक्ष करीत आहे.

### पंतप्रधान जन आरोग्य योजनेचे कार्ड वाटप

**नगर :** केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना असतात, मात्र सर्वसामान्य जनतेला त्या योजनांची माहिती नसल्यामुळे त्यांना लाभ घेता येत नाही, यासाठी शासनाच्या योजनांची समाजामध्ये जनजागृती करत त्यांना लाभ मिळवून दिला जातो, पंतप्रधान जन आरोग्य कार्डच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला आरोग्याच्या सुविधा मिळणार आहेत, यासाठी सारसनगर परिसरामध्ये आ. संग्राम जगताप यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पंतप्रधान जन आरोग्य कार्ड वाटप करण्यात आले आहे.

### सातभाई कॉलेजच्या गुणवंतांचा सन्मान

**कोपरगाव :** तालुक्यातील कमलाताई बाळासाहेब सातभाई तांत्रिक ज्युनिअर कॉलेज कासलीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आमदार आशुतोष काळे यांच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्यात गौरव करण्यात आला. प्रथम क्रमांक क्रमांकाने उत्तीर्ण झालेली सायली दुशिंग, द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेली पूजा जाधव व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेला मयूर काळे या गुणवंत विद्यार्थ्यांचा आमदार आशुतोष काळे यांनी सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करत त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### अल्पवयीन मुलीवर दोघांचा वारंवार अत्याचार

**जामखेड :** तालुक्यातील खर्डा पोलीस स्टेशन हद्दीतील नायगाव येथील अल्पवयीन मुलीवर बळजबरीने व वेळोवेळी शारीरिक संबंध ठेऊन तिला जिवे मारण्याची धमकी दिले प्रकरणीनायगाव येथील राजेश बबन उगले, बाळासाहेब काशिनाथ लेंडे रा. नायगाव ता. जामखेड या दोन आरोपींविरूद्ध खर्डा पोलीस स्टेशनला भा. द. वी. कलम ३७६ नुसार बलात्काराचा तसेच बालकांचे लैंगिक अपराध पासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४ व ६ प्रमाणे तसेच गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### श्रीरामपूर शहरातील अवैध धंदे बंद करा

**श्रीरामपूर :** शहरात जुगार, मटका व इतर अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरू झाले आहेत. हे अवैध धंदे तातडीने बंद करावेत, अन्यथा गांधी पुतळ्याजवळ उपोषण करण्यात येईल, असा इशारा भारतीय जनता पक्षाच्या श्रीरामपूर शहर पदाधिकाऱ्यांनी पोलिसांना दिला आहे.

# संगमनेरात ५० हजार ८५० हेक्टरवर होणार पेरणी

**■ बाजरी, मका व सोयाबीन पिकांना प्राधान्य ■ बियाणे-खते उपलब्ध ■ कृषी विभागाची माहिती**

संगमनेर : प्रतिनिधी

**तालुक्यात समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी पेरणीस सुरुवात केली आहे. तालुका कृषी अधिकारी प्रवीण गोसावी यांनी कृषी विभागाने केलेल्या नियोजनाची माहिती दिली. तालुक्यातील एकूण १ लाख १३ हजार ५१० हेक्टर लागवडीखालील क्षेत्रापैकी खरीप लागवडीखालील क्षेत्र ५० हजार ८५० हेक्टर आहे.**



तालुक्याचे सरासरी पर्जन्यमान ३५१.१३ मिमी असून, मागील वर्षी २८६.३ मिमी पाऊस झाला होता. यंदाच्या खरीप हंगामात बाजरीचे प्रस्तावित क्षेत्र १४ हजार ५०० हेक्टर, मका १६ हजार ६८०, सोयाबीन १९ हजार हेक्टर राहण्याचा अंदाज आहे. या पिकांचे बियाणे उपलब्ध झाले आहे. खताचे नियोजन झाले असून, युरिया- ७४५४ मे.टन, डीएपी १९०८ मे.टन, एमओपी-११३५ मे.टन, एसएसपी २३८१ मे.टन, संयुक्त खते ५६६२ मे.टन याप्रमाणे मागणी नोंदवलेली आहे.


खरिपात कृषी निविष्टाचे गुण नियंत्रणासाठी तालुका स्तरावर तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाची स्थापना केली आहे. खरिपासाठी १४० विस्तार प्रकल्प राबवण्याचे नियोजन केले आहे. त्यात निविष्टा वाटप, शेतीशाळा, औजार पुरवठा व पीकवाढीचे अवस्थेत शास्त्रज्ञ भेटीचे नियोजन केले आहे. खरीप हंगामासाठी गतवर्षी नावीन्यपूर्ण कार्यक्रम संशोधित मटकी वाण आर एम ओ २२५१ या ६५-७० दिवसात परिपक्व होणाऱ्या वाणाची प्रात्याक्षिके घेण्यात आली. एकरी ४-५ क्विंटलपर्यंत उत्पन्न मिळाले. या पिकाचे लागवडीला यंदा चालना देण्यात येणार आहे.

विभागीय कृषि सहसंचालक महत्त्वाच्या २८ मोहीमा घेणार आहेत. त्यात बीजप्रक्रिया, घरगुती बियाणे चाचणी, खोडवा पिकातील पाचट व्यवस्थापन, हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी घरगुती प्रकाश सापळा उभारणी, सोयाबीनच्या घरगुती बियाण्याचा वापर करण्यासाठी बियाण्याचे उगवण क्षमता चाचणी घेणे, बहुतांश खरीप पिकाचे पेरणी बीबीएफ यंत्राने करणे, याबाबत गावोगाव मार्गदर्शन, कृषी कर्मचारी करीत असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी गोसावी यांनी दिली.

खरीप हंगामासाठी १४० विस्तार प्रकल्प राबवण्याचे नियोजन केले आहे. त्यामध्ये निविष्टा वाटप, शेतीशाळा, औजारपुरवठा व पीकवाढीचे अवस्थेत शास्त्रज्ञ भेटीचे नियोजन केले आहे. कृषी विभागाच्या विविध योजना, जसे कांदाचाळ उभारणी, ठिबक व तुषार संच, शेतीपयोगी यंत्र व औजारे, शेडनेट व हरितगृह उभारणी, फळबाग लागवड आदींसाठी अनुदान प्राप्त करण्यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महा-डीबीटी पोर्टलवरून आपली नावनोंदणी करून सहभाग नोंदवण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी प्रवीण गोसावी यांनी केले आहे.

# कृषी सेवा केंद्रातून पावणेदोन लाखाचे बियाणे चोरीला

**चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद**



शेवगाव : प्रतिनिधी

**तालुक्यातील बोधेगाव येथे शेवगाव-गेवराई रस्त्यालगत असलेल्या एका कृषी सेवा केंद्राचे शटर तोडून अज्ञात चोरट्यांनी पावणेदोन लाखांचे कपाशी बियाणे व रोख रक्कम लंपास केली. सदरील घटना मंगळवारी ( दि.११) पहाटे अडीचच्या सुमारास घडली. दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोरटे कैद झाले असून याप्रकरणी शेवगाव पोलिसांत फिर्याद दाखल करण्यात आली आहे.**

बोधेगाव पासून पश्चिमेस साधारण अर्धा किलोमीटर अंतरावर शेवगाव-गेवराई रस्त्यालगत पेट्रोल पंपासमोर विष्णू गहिनीनाथ बोडखे (वय ४१) यांचे कृषी सेवा केंद्र दुकान आहे. सोमवारी सायंकाळी ते दुकानात बियाणे व इतर माल व्यवस्थित लावून नेहमीप्रमाणे दुकान कुलूपबंद करून घरी गेले. मंगळवारी पहाटे अडीचच्या सुमारास चोरट्यांनी परिसरात लाईट नसल्याने अंधाराचा फायदा घेत शटरची लोखंडी पट्टी तोडून दुकानात प्रवेश केला. त्यानंतर दुकानातील इन्व्हर्टरचे बटण बंद करून सीसीटीव्हीसह दुकानातील वीजपुरवठा खंडित केला. मग चोरट्यांनी दुकानातील प्रत्येकी ८६४ रूपये किंमतीचे १९२ नग कपाशी बियाणांचे पॅकेट, ५ हजार रुपयांच्या दोन सोयाबीन बीयांच्या बॅगा व गल्ल्यातील ४ हजार ५०० रूपये रोकड असे अंदाजे १ लाख ७५ हजार ३८८ रूपयांचा मुद्देमाल घेऊन तेथून पोबारा केला.

मंगळवारी पहाटे सहाच्या सुमारास विष्णू बोडखे यांचे लहान भाऊ दुकानासमोरून जात असताना त्यांना दुकानचे शटर अर्धवट उघडे दिसले. त्यांनी तातडीने विष्णू बोडखे यांना फोन करून बोलावून घेतले. बोडखे हे तिथे आल्यावर त्यांना चोरी झाल्याचे निदर्शनास आले. तेव्हा त्यांनी दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता तोंडावर अर्धवट रूमाल बांधलेले चोरटे कॅमेऱ्यात दिसून आले. याप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक दिगंबर भदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस उपनिरीक्षक नानासाहेब गर्जे पुढील तपास करत आहेत.

चोरट्यांनी चोरी करण्यापूर्वी आधी रूमालाने अर्धवट तोंड बांधून घेतले. त्यानंतर हातातील गलोलीतून कृषी सेवा केंद्राच्या समोर बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यावर दगडांचा मारा केला. काही दगड सीसीटीव्ही कॅमेऱ्याला लागले तर काही दगड शेजारील इमारतीवर जाऊन पडले. त्यानंतर एका कॅमेऱ्यावर रिकामी गोणी टाकून सीसीटीव्ही झाकण्याचा प्रयत्न चोरट्यांनी केल्याचे सीसीटीव्हीत दिसून येते.

(पान १ वरून)

## अपघाताने भेट झाली तरी ती चुकच!

कागदपत्रांची पुर्तता करून गुरूवारी मतदारसंघात जाताता पुणे विमानतळावर मी उतरलो. पुण्यात कुस्तीमधील नामांकित मल्ल असलेल्या पवार यांचे कॅन्सरच्या आजाराने आठ दिवसांपूर्वी दुर्देवी निधन झाले. त्यांच्या कुटूंबियांची भेट घेण्यासाठी विमानतळावरून मी गेलो होतो. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रसेचे पदाधिकारी प्रविध धनवे यांच्या घरी भेट देऊन परतत असताना संबंधित व्यक्तीने मला घरी चहा पिण्यासाठी येण्याचा आग्रह धरल्याचे लंके म्हणाले. लंके पुढे म्हणाले, राजकारणात, समाजकारणात काम करताना कोणत्याही व्यक्तीने हात केला तर थांबून त्याच्याशी बोलावे लागते. सबंधित व्यक्तीची पार्श्वभुमी मला माहीती नव्हती. असे असताना एखादी व्यक्ती आग्रहाने बोलवित असेल तर आपण गेले पाहिजे. त्यांच्या घरी जाऊन आम्ही चहा घेतला. त्यानंतर त्यांनी माझा सत्कार केला. सकाळी ज्यावेळी वृत्तवाहिन्यांवर बातम्या सुरू झाल्या त्यावेळी मला सबंधित व्यक्तीची पार्श्वभूमी माहिती झाली. केवळ अपघाताने हा प्रकार घडलेला आहे. अशा प्रकारांशी अथवा संबंधित व्यक्तीशी माझा कोणताही हितसबंध नसल्याचे लंके यांनी स्पष्ट केले. कुख्यात गुंड गजा मारणे याच्याकडून तुम्ही सत्कारही स्विकारला. सत्ताधाऱ्यांकडून त्यावर टीकेची झोड उठविली जाते असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर लंके म्हणाले, आपणास सबंधित व्यक्तीची पार्श्वभुमी माहीती असायला हवी. मला जर वस्तुस्थिती काय आहे हे माहीती असते तर मी थांबलोच नसतो. त्या भागात सांत्वनपर भेटीसाठी आम्ही गेलो होतो. रस्त्याने जाताना त्या व्यक्तीने थांबविल्यावर आम्ही थांबलो. त्या व्यक्तीच्या भेटीचे कोणतेही नियोजन नव्हते. एखाद्या नियोजित कार्यक्रमास जायचे असेल तर आपण पार्श्वभुमी माहीती करून घेत असतो. मात्र इथे अचानकपणे एखादी व्यक्ती भेटल्यानंतर त्याच्या कपाळावर तर काही लिहिलेले नसते की तो कोण आहे ? काय आहे ? आम्ही ग्रामीण भागातील आहोत. आम्हाला शहरातील परिस्थिती माहीती नसते असा खुलासा करतानाच अपघाताने ही भेट झाली तरी ती चुकच होती अशी कबुलीही लंके यांनी दिली आहे.

### अजित पवारांच्या अडचणी वाढल्या

माणिकराव जाधव यांच्या वकिलांना वेळ दिला आहे. तर २९ जूनला पुढची सुनावणी होणार आहे. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने अजित पवार आणि इतरांना क्लीन चिट दिली आहे. शिखर बँक घोटाळा प्रकरणी अजित पवार, सुनेत्रा पवारांना दिलासा राज्यातील बहुचर्चित तब्बल २५ हजार कोटी रुपयांच्या शिखर बँक घोटाळ्या प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार, त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार आणि इतर आरोपींच्या अडचणी वाढल्या होत्या. पण मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने (इओडब्ल्यू) दिलासा दिला. तसेच, या घोटाळ्या प्रकरणी कोणतेच पुरावे नसल्याचे पोलिसांनी म्हटले. त्यामुळे या प्रकरणातील सर्व दोषींना दिलासा देण्यात आला. ऐन लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत अजित पवार यांच्यासह सुनेत्रा पवार यांना देखील या प्रकरणी दिलासा देण्यात आलेला. पोलिसांनी या प्रकरणी जानेवारी महिन्यात क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. बँकेच्या कर्ज वाटप आणि साखर कारखाने विक्रीत अनियमितता असल्याचे आरोप अजित पवार आणि इतर आरोपींवर करण्यात आलेले. क्लोजर रिपोर्ट सादर करतांना कर्ज वाटप आणि साखर कारखाने विक्री संबंधी बँकेला नुकसान झाल्याचे कोणतेच पुरावे नसल्याचं आर्थिक गुन्हे शाखेने म्हटले आहे. त्यामुळे अजित पवार यांना दिलासा देण्यात आला आहे.

# पावसानंतर नगर जिल्ह्यातील २७ टँकर बंद

नगर : प्रतिनिधी

**यंदा जिल्ह्यात पावसाने जूनच्या सुरूवातीलाच समाधानकारक कामगिरी केली. मागील दोन-तीन दिवसांपासून जामखेड, कर्जत, पाथर्डी, श्रीगोंदे, नगर तालुक्यात १०० मिलीमीटर पेक्षा अधिक पाऊस पडला. उन्हाळ्यात तळाला गेलेली पाणी पातळी वाढल्याने जिल्हा प्रशासनाने नगर जिल्ह्यातील २७ टँकर बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.**

सध्या जिल्ह्यात ३२० टँकरद्वारे सहा लाख सात हजार ४१ नागरिकांना पाणीपुरवठा केला जात आहे. यात सर्वाधिक पाथर्डी तालुक्यात ११० टँकर सुरू आहेत. तसेच संगमनेर ३१, नगर ३५, पारनेर ३६, कर्जत २९, जामखेड २६ अशा एकूण ३२० टँकरद्वारे नागरिकांची तहान भागवण्यात येत आहे. यंदा पावसाने जिल्हाभर सर्वदूर हजेरी लावल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. पावसामुळे पाणी पातळीत वाढ होत असल्याने प्रशासनाने जिल्ह्यात सुरू असलेले ३४७ पैकी २७ टँकर बंद केले आहे.










# निघोजची वेस नव्याने उभारणार

**■ शिवाजीराव लंके यांची एक लाखांची देणगी ■ २५ लाख रूपये खर्च**
**■ अपेक्षीत शिवकालीन स्वरूपात होणार बांधकाम**

**निघोज : प्रतिनिधी**

**कोणत्याही गावाचे नाक म्हणून ओळख असलेल्या वेशीचे लोकसहभागातून नव्याने बांधकाम करण्याचा निर्णय निघोज ग्रामस्थांनी घेतला आहे. या बांधकामासाठी २५ लाख रूपये खर्च असून शिवकालीन बांधकामच्या धर्तीवर हे काम करण्यात येणार आहे.मळगंगा देवी यात्रोत्सवाच्या हिशोबासाठी श्रीराम मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या ग्रामस्थांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, हा निर्णय झाल्यानंतर किशन कन्हैय्या दुध उद्योग समुहाचे शिवाजीराव लंके यांनी एक लाख रूपयांची देणगी देण्याचा निर्णय यावेळी जाहिर केला.**

दरवर्षी ग्रामस्थ तसेच भाविकांकडून यात्रोत्सवाच्या काळात देणग्या देतात. त्यातून यात्रोत्सवासाठी खर्च करण्यात येतो. यात्रेनंतर महिनाभरात ग्रामस्थांपुढे संपूर्ण हिशेब सादर करण्यात येउन त्यास ग्रामस्थांकडून मंजुरी घेण्यात येते. अनेक वर्षांची ही परंपरा अव्याहतपणे सुरू आहे. याच बैठकीत गावाच्या वेशीची नव्याने उभारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

बैठकीस मा. चेअरमन बाळासाहेब लामखडे, मा. उपाध्यक्ष अनंतराव वरखडे, अनिल शेटे, रामदास रसाळ, पोपटराव लंके, ट्रस्टचे उपाध्यक्ष वसंत कवाद, सहसचिव विश्वास शेटे, शंकरराव लामखडे, रमेश ढवळे, संतोष रसाळ, भिमाजी शेटे, पत्रकार भास्कर कवाद, रमेश वरखडे, संतोष ढवण, संकेत वरखडे, बबन लामखडे, अनिल लंके यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



■ मळगंगा देवीच्या यात्रोत्सवाच्या हिशोबाच्या बैठकीत निघोजच्या वेशीची नव्याने उभारणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### लंके, शेटे यांच्याकडून वेशीसाठी देणगी

**लोकसहभागातून उभारण्यात येणाऱ्या वेशीच्या बांधकामाचा निर्णय जाहिर होताच किशन कन्हैय्या दुध उद्योग समुहाचे शिवाजीराव लंके यांनी एक लाख रूपयांची देणगी जाहिर केली तर सेवानिवृत्त शिक्षक भिमाजी शेटे यांनीही १० हजार ५०० रूपयांची देणगी जाहिर केली. उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले.**

### यात्रोत्सवात १४ लाख रूपये देणगी जमा

**बैठकीच्या प्रारंभी यात्रोत्सव समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, उपाध्यक्ष अर्जुन लामखडे, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, सदस्य दिलीप ढवण व इतर सदस्यांनी यात्रोत्सवाचा जमा खर्च सादर केला. यात्रोत्सवाच्या काळात १४ लाख १८ हजार रूपयांची देणगी जमा झाली असून ७ लाख १० हजार रूपये खर्च झाले. उर्वरीत रक्कम बँकेत ठेवण्यात आल्याचे यात्रोत्सव कमिटीकडून सांगण्यात आले.**

# हंग्यात येणाऱ्या अभ्यांगतांसाठी प्रसाधनगृहाची व्यवस्था

**हंगे ग्रामपंचायतचा पुढाकार**

**हंगे : प्रतिनिधी**

**खासदार नीलेश लंके यांच्या भेटीसाठी जिल्हाभरातून हंगे येथे येणाऱ्या अभ्यांगतांसाठी हंगे ग्रामपंचायतीच्या वतीने प्रसाधनगृहाची व्यवस्था करण्यात आली असून या प्रसाधनगृहाचे खा. लंके यांच्या हस्ते शुक्रवारी लोकार्पण करण्यात आले.**




खा. नीलेश लंके यांचा दररोजचा दिनक्रम भरगच्च असतो. त्यांची भेट घ्यायची असेल तर त्यांचा दौरा ज्या भागात असेल तिथे जाउन त्यांची भेट घ्यावी लागते. परंतू तिथेही त्यांच्या भोवती कार्यकर्ते तसेच नागरीकांचा मोठा गराडा असल्याने अनेकांची भेटही होऊ शकत नाही. त्यामुळे खा.लंके हे घराबाहेर पडण्यापूर्वीच जिल्हा तसेच जिल्हयाबाहेरील घरी जाऊन त्यांची भेट घेतात, त्यांच्याकडून आपली कामे मार्गी लावून घेतात. लंके हे ज्या ज्या वेळी घरी असतात त्यावेळी त्यांच्या घरी जनता दरबार भरल्याचे चित्र रोजच पहावयास मिळते.

खा. लंके हे विधानसभा सदस्य होण्या अगोदरपासूनच त्यांच्या घरी माणसांची गर्दी असे. आमदार झाल्यानंतर ही गर्दी वाढली. आता तर लंके हे संसद सदस्य झाल्याने त्यांच्या भेटीसाठी येणाऱ्या अभ्यांगतांची संख्या मोठया प्रमाणावर वाढली आहे.हंगे येथे परगावांहून आलेल्या नागरीकांची प्रसाधनगृहाची सोय नसल्याचे चांगलीच कुचंबना होते. ही बाब लक्षात आल्यानंतर सरपंच राजेंद्र शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून हंगे येथे फिरत्या प्रसाधनगृहाची सोय केली. त्याचे खा. लंके यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या वतीने ही सोय करण्यात आल्याने बाहेर गावांवरून येणाऱ्या नागरीकांना सुविधा उपलब्ध झाली आहे. प्रसाधनगृहाच्या लोकार्पणाप्रसंगी सरपंच राजेंद्र शिंदे, उपसरपंच निता रासकर, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक शेटवड, संदीप शिंदे, दत्ता नगरे आदी उपस्थित होते.

# भाजपा इच्छुकांच्या नावात खामकरांची भर!

**भाजपा नवा चेहरा लॉन्च करणार असल्याचा दावा**

**पारनेर/सुपा : प्रतिनिधी**



**लोकसभा निवडणूकी पाठोपाठ होऊ घातलेल्या विधानसभा निवडणूकीसाठी भारतीय जनता पार्टीकडून निवडणूक लढविण्यासाठी उत्सुक असलेल्या उमेदवारांची यादी मोठी असतानाच भाजपा धक्कातंत्राचा वापर करून नव्या चेहऱ्यास पुढे करणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.ओबीसी नेते प्रसाद खामकर यांची प्रदेश पातळीवर भाजपाचे उमेदवार म्हणून चर्चा सुरू झाल्याचे सांगण्यात येत आहे.**

सन २०१९ च्या विधानसभा निवडणूकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नीलेश लंके यांनी मोठे मताधिक्क्य घेत विजय संपादन करून १५ वर्षानंतर पारनेर मतदारसंघात भाजपा-सेना युतीच्या उमेदवाराचा पराभव झाला. तेच चित्र अलिकडेच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीतही पहावयास मिळाले. महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी मतदारसंघात मताधिक्य घेतले. त्यामुळे भाजपाचे शिर्षस्थ नेते चांगलेच सतर्क झाले असल्याचे सांगण्यात येत आहे. मतदार संघातील राजकीय समीकरणे पाहिली तर आगामी विधानसभा निवडणूकीत महायुती व महाविकास आघाडीच्या उमेदवारांमध्ये उमेदवारीसाठी रस्सीखेच होणार असल्याचेही नमुद करण्यात आले आहे.

पारनेर मतदारसंघासाठी भाजपाकडून नवे नाव चर्चेत आल्याचे सांगितले जात असून शेतकरी तसेच पाणी प्रश्नावर नेहमीच सरकारशी पत्रव्यवहार करून बैठकांच्या माध्यमातून विषय मार्गी लावणारे बहुजन समाजाच्या हक्क आणि अधिकारासाठी लढा देणारे, नगर जिल्हयात सामाजिक कार्याच्या माध्यमातून काम करणारे ओबीसी नेते प्रसाद खामकर यांच्या नावाची प्रदेश पातळीवर चर्चा झाल्याचा दावा करण्यात आला आहे. प्रसाद खामकर हेम आर्थिक विश्लेषक, कृषी विश्लेषक असून फुले शाहू आंबेडकर चळवळीच्या माध्यमातून विविध सामाजिक कार्यात महाराष्ट्र आणि देशात अग्रेसर असतात.

विविध पक्ष, सर्वपक्षीय नेते, अधिकारी, खेळाडू, कलाकार यांच्याशी खामकर यांचे स्नेहाचे संबंध आहेत. मराठी, हिंदी कलाक्षेत्रातही ते परीचित आहेत. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा, मा. मंत्री अनुराग ठाकूर, केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान, भाजपाचे महामंत्री बी. एल.संतोष यांच्याशी खामकरांचा थेट परिचय असून केंद्रीय नेत्यांच्या संपर्कामुळे खामकर यांच्या उमेदवारीस हिरवा कंदील मिळेल असा दावा करण्यात आला आहे.

# दत्त मंदिरात सरळ उभे वैशिष्ट्यपूर्ण पिंपळाचे झाड

**भाविक भक्तांनाही वृक्षाची भुरळ**



**चास : प्रतिनिधी**

**आपण पिंपळाचे झाड असंख्य ठिकाणी पाहतो ते कोठेही उगवते अगदी घरावर सुद्धा पण हे झाडाला साधारण ७ फुटाच्या उंचीनंतर फ़ांद्या फुटलेल्या असतात व ते डेरेदार झालेले दिसते परंतु नगर पुणे रोडवरील केडगावच्या पुढे गोंडाळ मळा,चास येथील ओढ्यातील दत्त मंदिरात एक वैशिष्ट्यपूर्ण सरळ उभे वैशिष्ट्यपूर्ण पिपळाचे झाड आहे त्याची उंची आता ३० फुटाच्या पुढे गेलेली आहे ,२० वर्षांपूर्वी हे झाड औदूंबरच्या झाडाशेजारी उगवले त्याचे वैशिस्ट म्हणजे त्याला दोन खोड आहे व ते दोन्ही एकदम सरळ आहे कोठेही वेडीवाकडी वळणे किंवा फ़ांद्या नाहीत.**

दर्शन घेतल्यावर भक्त गण जेव्हा मंदिराला प्रदक्षिणा मारतात तेव्हा ते दृष्टीस पडते त्याकडे पाहून भाविक आश्यर्यचकित होतात, हे निसर्ग निर्मित आहे कि मंदिरावर फांद्या येऊ नये हि देवाची कृपा आहे असे समजतात कारण मंदिराच्या भिंतीपासून हे साधारण ६ फुटावर उगवलेले आहे.

हे दत्तमंदिर पुरातन क्षेत्र असून ओढ्यात असून दोन्ही बाजूने डोंगर आहे व मध्ये दत्तक्षेत आहे मंदिराच्या मागे बंद खदान असून तिथे तळे निर्माण झालेले आहे त्यामुळे हे धार्मिक बरोबर पर्यटन स्थळ देखील आहे. नगर- पुणे रोडवरील प्रवासी , कुटुंब शेकडो वर्षांपासून येथे दर्शनासाठी व विश्रांतीसाठी येथे थांबतात,दर गुरुवारी रात्री आरतीसाठी नगरकर व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने येथे येतात.

# जाहिरातदारांची वृक्षांकडे वक्रदृष्टी

**रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या वृक्षांवर जाहिरातींचे फलक**

**सुपा : प्रतिनिधी**

**जाहिरातदारांकडून शहरे, गावांमधील मोक्याच्या जागांचे विद्रुपीकरण करण्याच्या घटना नव्या नाहीत आता तर जाहिरातदारांची विशाल वृक्षांवर वक्रदृष्टी गेली असून फलक लावण्यासाठी खिळे ठोकण्यात येत असल्याने या वृक्षांची हानी होत असल्याची वृक्षप्रेमींची तक्रार आहे.**

पारनेर शहरासह टाकळी ढोकेश्वर, कान्हूरपठार, भाळवणी, सुपा, वाडेगव्हाण, निघोज, राळेगणसिध्दी आदी गावांच्या रस्त्याच्या दुतर्फा सार्वजनीक बांधकाम विभाग, वन विभाग यांच्याकडून वड, आंबा, चिंच, पिंपळ, ससम आदी वृक्षांचे संगोपन करण्यात आले आहे. तालुक्यातील विविध शिक्षण संस्था, खाजगी संस्थांचे चालक, विविध इन्स्टिटयुट, इंजिनिअरींग कॉलेजेस आदींकडून व्यवसायिक जाहिराती रस्त्याच्या कडेला असेलल्या वृक्षांवर लावण्यात येत आहेत. या जाहिराती लावताना खिळे तसेच तारांचा वापर करण्यात येत असल्याने वर्षानुवर्षे जोपासलेल्या या वृक्षांची हाणी होत असल्याचे वृक्षप्रेमींचे म्हणणे आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सबंधितांवर दंडात्मक कारवाई करून हे फलक हटविण्याची मागणीही करण्यात आली आहे.




■ रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या वृक्षांवर जाहिरातीचे फलक लावून पर्यावरणाचा -हास करण्यास जाहिरातदार हातभार लावत आहेत.

### तर गुन्हा दाखल होईल

**खिळे ठोकणे, पोस्टर लावणे, स्टिकर चिटकविणे आदी प्रकार आढळून आल्यास महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायदा १९९५ अन्वये जवळच्या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊ शकतो.**

**तालुक्यातील बहुतांश गावांना जोडणाऱ्या रस्त्यांच्या दुतर्फा असलेल्या झाडांवर व्यवसायिकांकडून जाहिरातील लावण्याचे प्रमाण वाढत आहे. ते लावण्यासाठी खिळे, तारांचा वापर करण्यात येतो. वास्तविक मानवी शरीर संस्था ज्याप्रमाणे आहेत त्याच प्रमाणे वनस्पती संस्थेमध्यही अन्न व पाणी वाहनासाठी विविध वाहिन्या असतात. झाडावर फलक लावण्यासाठी गज, खिळे ठोकले जातात त्यामुळे झाडाला अन्न तसेच पाणी पुरवठा करणाऱ्या शिरा तुटून झाड सुकून जाण्याचे प्रकार घडतात. फलक लावण्यासाठी वापरण्यात येणारी तार, तंगुस हे पक्षांसाठी घातक ठरतात. अनेक पक्षी त्यामुळे दगावल्याची उदाहरणे आहेत. स्वतःच्या तुटपुंज्या फायद्यासाठी होणारा निसर्गाचा -हास थांबला पाहिजे.**

**प्रा. तुषार ढुबे**
वृक्षप्रेमी

# बनाभाई सय्यद यांचे वृद्धापकाळाने निधन

**हिवरे बाजारच्या राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक हरपले**

**हिवरे बाजार: प्रतिनिधी**

**आदर्श गाव हिवरे बाजार येथील राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक बनाभाई चांदभाई सय्यद यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी राहत्या घरीच वृध्दापकाळाने निधन झाले.ते मुस्लीम समाजातील असूनही पंढरपूर,आळंदी,देहू नियमित वारी करत असून ते पांडुरंगाचे व माऊली ज्ञानेश्वरांचे निस्सीम भक्त होते.**



गावातील भजनीमंडळात ते नेहमी सक्रीय होते.त्यांचा नातू निसार व हुसेफ हे दोघे आजही हनुमान चालीसा व भजनात असतात.तसेच त्यांचा मुलगा हबीब सय्यद गावात काम करत असतात. म्हणून ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून मशीदीचे बांधकाम करण्यात आलेले आहे.अल्लाहएवढीच भक्ती त्यांच्या पंढरीच्या पांडुरंगावर होती.म्हणूनच एका मुस्लीम कुटुंबासाठी मशीद बांधणारे गाव म्हणून त्यांच्या रूपाने हिवरे बाजारला लौकिक मिळाला.त्यांच्या जाण्याने त्यांच्या परिवारासह ग्रामस्थांना अतीव दुख झाले आहे. त्यांच्या पश्चात मुलगा रहेमान,हबीब व मुलगी जायदा सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे हिवरे बाजारच्या राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक हरपल्याची भावना पद्मश्री पोपटराव पवार यांनी व्यक्त केली.

# जवळ्याच्या बसस्थानकाची दयनीय अवस्था

**सुविधांचा अभाव; प्रवासी त्रस्त**

**जवळा : प्रतिनिधी**

**ऊन, वारा, पावसाच्या बचावासाठी एसटी बसस्थानक परिसरात बस येईपर्यंत प्रवाशांना सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून बसस्थानकाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. परंतु, पारनेर तालुक्यातील जवळे येथील बसस्थानकाची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे.**



प्रवाशांना बसण्यासाठी बसस्थानकात बाकडे नाहीत. बसस्थानकातील फरशी उखडलेली आहे. दरवर्षी पाऊस झाल्याने रस्त्यावरील पाणी बसस्थानकात शिरते. बसस्थानक परिसरात पाणी साचत असल्याने पूर्ण परिसर चिखलमय होतो. त्या पाण्याची काही दिवसानंतर दुर्गंधी येते व डासांचे साम्राज्य निर्माण होते. प्रवाशांना बसस्थानक असून, अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक प्रवाशांना बसस्थानकात न बसता मुख्य रस्त्यावर उभे राहून बसची वाट पाहावी लागते.

जवळे येथील बसस्थानकावरून शिरूर येथे कॉलेजचे शिक्षण घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची नेहमीच वर्दळ असते. तसेच परिसरातील सांगवी सूर्या, गांजी भोयरे, गुणोरे व परिसरातील गावातील नागरिक येथील बसस्थानकात येतात. बसस्थानक हे रस्त्यापेक्षाही खोल गेले आहे. त्यामुळे प्रथम त्याची उंची वाढवावी. पावसाळ्यात पावसाचे पाणी बसस्थानकात शिरते. ते होऊ नये म्हणून पाणी पुढे जाईल त्याची सुविधा करावी. बसस्थानक परिसरात मुरूम टाकावा. तसेच बसस्थानकाच्या आतमध्ये बसण्यासाठी बाकडे करावीत, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

# दस्तऐवजांच्या संगणकीकरणात नगर जिल्हा राज्यात अग्रेसर

**जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांची माहिती**

**नगर : प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील १ कोटी ७ लाख दस्तऐवजांचे संगणकीकरण करत नगर जिल्हा राज्यात अग्रेसर ठरला आहे. या योजनांचा व माहितीचा लाभ शेतकरी, सर्वसामान्यांना विनासायास सेवा देऊन त्यांचे जीवन अधिक सुसह्य करण्यासाठी सीएससी चालकांनी अधिक जबाबदारीने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.**

शहरातील सहकार भवन येथे विविध योजना, माहितीबाबत एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी, उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे, उपजिल्हाधिकारी हिरामण झिरवळ, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सुनील इंदलकर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी म्हणाले, शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांना शासनाच्या विविध योजनांबरोबरच आवश्यक असणारी कागदपत्रे मिळविण्यासाठी पूर्वी शासकीय कार्यालयात चकरा माराव्या लागत होत्या. सामान्यांचा वेळ, श्रम व पैसा वाचवून त्यांना घरबसल्या योजनांच्या लाभाबरोबरच आवश्यक माहिती मिळण्यासाठी शासनाने डिजिटल प्रणालीवर भर दिला. आज घडीला संगणकावरुन अगदी कमी वेळात या सर्व गोष्टी शक्य होत आहेत.



'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com